।। श्रीगणेशायनमः ।। ।। श्री दत्त कृपा ।।

हॉटेल बळीराजा

बळीराजा AGRO RESORT

फॅमिली गार्डन रेस्टॉरंट अ‍ॅण्ड फास्ट फूड

* साऊथ इंडियन
* पंजाबी * चायनीज
* तंदूर * महाराष्ट्रीयन

नाष्टा व जेवणाची उत्तम सोय

संपर्क : 8999854954, 8668738334

पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड



सायं.दैनिक

बीड

# प्रारंभ

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे



हॉटेल गौरव

Hotel Gaurav

रेस्टो बार, डिलक्स रूम

एसपी ऑफीससमोर, बार्शी रोड, बीड

प्रो.प्रा.नितीन खोड

एक वेळ आवश्य भेट द्या



बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ६ वे ■ अंक ३७ ■ शनिवार, दि.०४ एप्रिल २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■ पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-6 ■ Issu- 37 ■ Saturday, 04 Apr -2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4


# वाद होतील अशा ठिकाणी पुतळे उभारू नका

# आपल्या राजाने जगासाठी खूप केलंय -मनोज जरांगे



प्रारंभ । वृत्तसेवा

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजणगावमध्ये खेलोबामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यावरून मोठा तणाव निर्माण झाला होता. आंदोलकांनी ८ ते १० तास रस्ता रोको केल्यामुळे आणि दगडफेक झाल्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. ग्रामस्थांनी आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पुतळा हटवण्यास तीव्र विरोध केला होता. आत निर्माण झालेल्या वादावर अखेर तोडगा निघाला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आलेली जागा ही खेलोबा देवस्थानची असल्याबाबत दोन्ही समाजाचे एकमत झाले आहे. त्यामुळे आता या पुतळ्याचे स्थलांतर केले जाणार आहे. यासाठी दोन्ही समाजाचे प्रतिनिधी मिळून नवी जागा शोधणार आहेत. आता या प्रकरणावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

### पुतळा विकणारा कोण? याचा शोध घ्यावा लागणार

दोन-चार इकडचे तिकडचे उलटबाजी करतात. मात्र मराठा आणि धनगर समाजामध्ये वाद निर्माण होऊ द्यायचं नाही. गेल्या चार दिवसापासून मी या भूमिकेत होतो. तो वाद वाढला नाही हे खूप चांगलं झालं. हा वाद लावला जातोय की काय? अशी मला शंका आहे. पुतळा विकणारा कोण याचा शोध घ्यावा लागणार आहे. मला माहीतच नव्हतं हा कोण आहे? पुतळा कोण देतोय, कोण घेतोय? काय प्रकरण आहे आणि कोणीही येऊन फोटो काढणार आणि मी त्याच्यासोबत आहे हे सांगणार, असे गैरसमज पसरवले जात आहे. माझं नाव वापरून मला डाग लावण्याचा प्रयत्न करू नये, असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, छत्रपतींचा सन्मान करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. छत्रपतींनी आपल्या सर्व समाजाला एकत्र ठेवले आहे. त्याच विचारांना आपल्याला पुढे घेऊन जाणं गरजेचं आहे. वाद मिटला ही खूप आनंदाची गोष्ट झाली. रात्री सोलापूरच्या एसपींनी सांगितलं होतं की, हा वाद मिटवणार आहेत. म्हणून मला जाण्याचा दौरा टाकता आला नाही. त्याच्या माग कोण होतं, काय होतं हे पोलीस प्रशासनाने शोधून काढलं पाहिजे. पण खूप चांगलं झालं की हा वाद मिटला.

वाद होतील अशा ठिकाणी पुतळे उभारू नका

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, वाद होतील अशा ठिकाणी पुतळे उभारू नका. आपल्या राजाने जगासाठी खूप केलंय. मला हे षडयंत्र कळायला तयार नाही. हे पुतळे कोण देत आहे? कोणीतरी येऊन माझ्याबरोबर फोटो काढतो आणि मराठा समाजामध्ये गैरसमज निर्माण होतो, असे देखील त्यांनी म्हटले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यावरून आणि तो तिथून हलवण्याच्या प्रशासनाच्या निर्णयावरून सुरू झाला होता. अंजणगाव येथे खिलोबा मंदिरासमोर रात्रीतून महाराजांचा पुतळा बसवण्यात आला होता. प्रशासनाने हा पुतळा तिथून हलवण्याचा निर्णय घेतल्यामुळे आंदोलक आक्रमक झाले होते. पुतळा ज्या जागेवर बसवण्यात आला आहे, त्या जागेवरून दोन गटांत ▶▶ पान २ वर...

# दुबई ते ऑस्ट्रेलिया, अशोक खरातचे हजारो कोटीचे हवाला रॅकेट; रोहित पवारांचा खळबळजनक आरोप

मुंबई । प्रतिनिधी

स्वतःला अध्यात्मिक गुरू म्हणवून घेणाऱ्या भोंदू अशोक खरातच्या पापाचा घडा आता भरत चालला असून, त्याच्याविरोधात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल झाले आहेत. आता अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी खळबळजनक आरोप केलाय. भोंदू खरात ऑस्ट्रेलिया, दुबई यासह चार पाच देशात हवालाच्या माध्यमातून 'मनी लाँड्रिंग' करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर या प्रकरणाची ईडी सारख्या केंद्रीय यंत्रणांनी तातडीने चौकशी करावी, अशी मागणी पवारांनी केली आहे.

रोहित पवार यांनी आपल्या 'एक्स' पोस्टमध्ये म्हटले आहे की, भोंदू खरात ऑस्ट्रेलिया, दुबई यासह चार पाच देशात हवालाच्या माध्यमातून मनी लाँड्रिंग करत



असल्याची तसंच खरातने भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट राजकीय नेत्यांचे हजारून अधिक कोटी या देशांमध्ये पाठवले असल्याचं कळत आहे. खरात हा केवळ भोंदू नाही तर एक मोठे 'नेक्सस' आहे, असा आरोप त्यांनी केलाय.

भोंदू खरात ऑस्ट्रेलिया, दुबई यासह चार पाच देशात हवालाच्या माध्यमातून करत असल्याची तसंच खरातने भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट राजकीय नेत्यांचे हजारून अधिक कोटी या देशांमध्ये पाठवले असल्याचं कळत आहे. खरात हा केवळ भोंदू नाही तर एक मोठे आहे, त्यामुळे या प्रकरणाची

या प्रकरणाची केंद्रीय संस्थानी सुद्धा चौकशी करणे गरजेचं आहे. हा विषय राष्ट्रीय सुरक्षेला सुद्धा आवाहन देणारा असल्याने राज्य सरकारकडे पुरेसे पुरावे आले असतील तर गृह विभागाने देखील या प्रकरणाचा राजकीय गोळाबेरजेसाठी वापर न करता सखोल चौकशी केली पाहिजे. असो! या प्रकरणातही सारख्या यंत्रणांना जाग येईल, ही अपेक्षा, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. दरम्यान, आधीच लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीच्या १२ गुन्ह्यांनी वेढलेल्या अशोक खरातसाठी रोहित पवारांचे हे आरोप मोठी अडचण ठरू शकतात. आता या प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणा एन्ट्री घेतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बीडमधील बेकायदेशीर सिमेंट मिक्सर प्लांटवर कारवाईची कधी?

### नगरसेवक अश्फाक इसहाक इनामदार यांचे तहसीलदारांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील श्री. संत भगवान बाबा प्रतिष्ठान परिसरात बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या सिमेंट मिक्सर प्लांटविरोधात नगरसेवक अश्फाक इनामदार यांनी तहसीलदारांकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. याआधी देखील स्थानिक नागरिकांनी या मिक्सर प्लांटची तक्रार केली होती परंतु प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली नसल्याने नगरसेवक अशपाक इनामदार यांनी स्वतः लक्ष घालून तक्रार केली आहे. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता हा प्लांट राजू रोज सुरू करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी निवेदनाद्वारे केला आहे. भगवान बाबा प्रतिष्ठान परिसरासह बालगुजार, झमझम कॉलनी आणि खासबाग या भागातील रहिवाशांना या प्लांटमुळे मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. सतत सुरू असलेल्या कामामुळे ध्वनी प्रदूषण वाढले असून, श्वसनाचे अनेक रोग देखील होण्याची शक्यता आहे यामुळे स्थानिकनागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.



सिमेंट मिक्सर प्लांटमधून उडणाऱ्या धुळीमुळे परिसरात वायू प्रदूषणाची समस्या गंभीर बनली आहे. यामुळे लहान मुले आणि वयोवृद्ध नागरिकांमध्ये खोकला, सर्दी, अ‍ॅलर्जी यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः गरोदर महिलांच्या आरोग्यावरही याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.सदर प्लांट दिवस-रात्र सुरू असल्याने मोठ्या वाहनांची सतत ये-जा सुरू असते. त्यामुळे परिसरात आवाजाचे प्रमाण वाढले असून नागरिकांना शांततेचा अभाव जाणवत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांच्या अनेक तक्रारी असल्याने हा प्लांट बंद करण्यात यावा असे मागणी केली. ▶▶ पान २ वर...

# घाटसावळी मंडळात अवकाळी पावसाचा कहर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील घाटसावळी मंडळात आज अवकाळी पावसाने हाकार उडून दिला सोसायटीच्या वाऱ्यासह अनेक गावांना तडाका बसला जोरदार वाऱ्यामुळे काही क्षणात घरावरील मगच पत्रे उडून गेले घराच्या भिंती ही कोसळल्या झाडे कोलमडली झाली तर भर उन्हाळ्यात नदी वाहू लागली या अवकाळी पावसामुळे आंब्याच्या बागा तुतीचे शेड या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

बीड तालुक्यातील वलीपूर घाट जवळा घाटसावळी पोखरी मैदा तांडा यासह परिसरातील काही गावांना शुक्रवारी दुपारी अवकाळी पावसासह सुसाट वाऱ्याने मोठा तडाखा दिला. चार ते पाच गावांमध्ये



### शेती पिकासह घरांचे लाखोंचे नुकसान

हाहाकार उडाला. तब्बल ५० घरावरील पत्रे उडून गेली. अनेक घरांच्या भींतीही कोसळल्या आहेत. जनावरांचे गोठे उद्धवस्त झाले. झाडे कोलमडली, उभे पीक आडवे झाले. फळबागांचेही प्रचंड नुकसान झाले. एवढेच काय भर उन्हाळ्यात तासभर झालेल्या पावसामुळे नदी दुथडी भरून वाहू लागली. चार ते पाच गावामध्ये उडालेल्या हाहाकारामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. बहुतांश शेतामध्ये पाणी साचले आहे. या भागात गेल्या शंभर वर्षात पहिल्यांदाच अवकाळी पावसाने असा तडाखा दिल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले आहे.

# तालुक्यात ४ व ५ एप्रिल रोजी एसआयआर मॅपिंग शिबिर नागरिकांनी लाभ घ्यावा

### फारूक पटेल, अमर नाईकवाडे व अशफाक इनामदार यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण अंतर्गत मतदार यादी मॅपिंग प्रक्रियेसाठी बीड तालुक्यात ४ व ५ एप्रिल २०२६ रोजी (शनिवार/रविवार) विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये मतदार यादीतील नावांची मॅपिंग केली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेचे गटनेते फारूक पटेल, नगरसेवक अमर नाईकवाडे व अशफाक इनामदार यांनी नागरिकांना या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

ते म्हणाले की, मतदार यादीतील अचूकता सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या प्रभागातील मतदान केंद्रावर जाऊन नावाची खातरजमा करून आवश्यक त्या दुरुस्त्या करून घ्याव्यात. यामुळे भविष्यातील निवडणुकांमध्ये कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार ▶▶ पान २ वर...





बीड तालुक्यातील वायभटवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित काल्याच्या किर्तनास आमदार संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला.

# वारकरी संप्रदायाचा वारसा जोपासणे ही काळाची गरज- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाचा पाया भक्कम असून संतांच्या आशीर्वादाने आज गावोगावी नामस्मरण सुरू आहे. समाज एकत्र आणणे हाच यामागचा मुख्य उद्देश असून, संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर समाज घडवण्याचे काम वारकरी कुटुंब करत आहेत. आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड येथील राधाकृष्ण नगरी भागात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



यांनी नमूद केले की, शक्ती आणि भक्तीची सांगड घालून हनुमानाची आराधना आणि परमेश्वराचे नामस्मरण करणे ही आपली परंपरा आहे. राधाकृष्ण नगरी भागातील नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा देण्याचा आमचा कायम प्रयत्न राहिला आहे. विकासाची ही आस आम्ही पूर्ण केली असून, येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या माध्यमातून धार्मिक कार्यालाही बळ मिळत आहे सध्याच्या काळात वाढत चाललेली 'भोंदूगिरी' आणि समाजाची होणारी दिशाभूल ▶▶ पान २ वर...

# खा.बजरंग सोनवणेंचा साधेपणा; हनुमान जयंतीच्या कार्यक्रमात पंगतीत वाढली बुंदी

### सारणी (आ.) येथे हनुमान जन्मोत्सवाला उपस्थिती, ग्रामस्थांसोबत उत्सवात सहभागी

केज । प्रतिनिधी

रस्त्याने जाताना कधी गाड्यांचा ताफा थांबवून शेतकऱ्यांशी संवाद साधणे, तर कधी थेट पेरणीसाठी चाढ्यावर मुठ ठेवताना खा.बजरंग सोनवणे यांना बीड जिल्हा बघत आलेला आहे. हाच साधेपणा जपत त्यांनी दि.२ रोजी जन्मगाव असलेल्या सारणी (आ) येथे हनुमान जयंती निमीत्त कार्यक्रमाला उपस्थिती लावली. जन्मोत्सवानंतर ग्रामस्थांच्या वतीने आयोजीत केलेल्या पंगतीत खा.बजरंग सोनवणे पद-प्रतिष्ठा बाजूला ठेवून बुंदी वाढण्यास पुढे सरसावले. या साधेपणामुळे 'कायम सामान्य माणसात मिसळणारा नेता' म्हणून त्यांच्याकडे बघीतले जात आहे.

खा.बजरंग सोनवणे हे कसालाही राजकीय वारसा नसताना ग्रामपंचायत, जिल्हा परिषद,



लोकसभा असा प्रवास करत आलेले आहेत. हे करताना त्यांनी गावाशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. गावासोबत जिल्ह्यातील सामान्य नागरिकांशी त्यांनी आपलेपणा कायम जपला आहे. सारणी (आ) येथे हनुमान जयंतीनिमीत्त दरवर्षी मोठा कार्यक्रम असतो. वर्षांनुवर्षे चालत आलेली ही परंपरा ग्रामस्थ मंडळी पुढे चालवत असून या कार्यक्रमाला खा.सोनवणे हे आपली कामे बाजूला सारून उपस्थित राहत असतात. दि.२ एप्रील रोजी गावात हनुमान जंयतीनिमीत्त कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. शिवाय गावात सप्ताह देखील सुरू आहे. सकाळी हनुमान जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ग्रामस्थ मंडळींनी मिळून पंगतीचे नियोजन केले होते. दरम्यान, पंगती बसल्या.यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी स्वत: बुंदीचे टोपले घेत पंगतीत वाढ केली. संपूर्ण पंगती संपेपर्यंत सोनवणे पंगतीत काम करताना दिसले. यावेळी ग्रामस्थ मंडळींनी 'आमच्या बप्पाचे पाय कायम जमीनीवर आहेत' अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. दि.२ रोजी हनुमान जयंती कार्यक्रम, तर दि.३ रोजी दिवसभर गावात थांबून कुस्तीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.


# सारे काही बेस्टसाठी...

मागील आठवड्यात आपण पाहिलेच की, बेस्ट कर्मचाऱ्यांच्या भल्याची जणू सर्वांनाच अचानक काळजी वाटू लागली आहे. आजवर त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणारे पक्ष आणि नेतेही आता बेस्ट कर्मचाऱ्यांच्या लढ्यात उडी घेताना दिसत आहेत. यामागील खरी पार्श्वभूमी म्हणजे मुंबई महापालिका निवडणुका. निवडणुका समीप आल्या की कामगारांच्या वेदना राजकीय मंचावर पोहोचतात; हे नवीन नाही. असो... एकीकडे मागील आठवड्यात बेस्ट कामगार नेते शशांक राव यांनी त्यांच्या कार्यालयात आंदोलन केले. दुसरीकडे अनेक वर्ष शिवसेना उबाठाशी निष्ठावान राहिलेले अनेक वर्षे बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी शिंदे गटात प्रवेश केला व उबाठावर जोरदार टीका केली. मात्र त्यात मागील आठवड्यात बाजी मारली ती, नारायण राणेप्रणीत बेस्ट समर्थ कामगार संघटनेने. त्यांनी थेट बेस्ट महाव्यवस्थापक सोनिया सेठी यांची भेट घेतली व खेळाचा पटच उलटवून टाकला. त्यांनी बेस्ट व्यवस्थापक सोनिया सेठी यांची घेतलेली भेट ही साऱ्या प्रकरणालाच कलाटणी देणारी ठरली. समर्थ कामगार संघटनेचे सरचिटणीस विलास पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नुकतीच बेस्ट महाव्यवस्थापिका सोनिया सेठी यांची भेट घेतली. ही भेट अत्यंत सकारात्मक वातावरणात पार पडली असल्याचे बोलण्यात येत असून, बेस्ट कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बैठकीत महत्त्वाच्या मागण्यांवरही चर्चा करण्यात आली. त्यात महत्त्वाच्या मागण्या होत्या की, बेस्टचा 'क' दर्जाचा अर्थसंकल्प मुंबई महापालिकेच्या 'अ' दर्जाच्या अर्थसंकल्पात विलीन करणे तसेच २०१९ मध्ये कामगार संघटनांसोबत झालेल्या करारानुसार, बेस्टच्या ३,३३७ मालकीच्या बसगाड्यांचा ताफा अबाधित ठेवणे. त्यासाठी आवश्यक नव्या बसगाड्या तातडीने खरेदी करणे. या मागण्यांना अंशतः मंजुरी देत, सेठी यांनी यासाठी मोठा निधी आवश्यक असल्याचे नमूद केले. तसेच, हा महत्त्वाचा आर्थिक निर्णय महापालिका आयुक्त आणि मुख्यमंत्री यांच्या स्तरावर जाऊन मंजूर होणार असून, त्याकरिता त्या लवकरच दोघांची भेट घेणार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे वेतनश्रेणी करार सन २०१६-२०२१ आणि २०२१-२०२६ पर्यंत सातव्या वेतन आयोगाप्रमाणे तातडीने लागू करावा, यावरही चर्चा करण्यात आली. यावर सेठी यांनी संघटनेने प्रस्ताव तयार करून द्यावा, त्यावर बेस्ट सकारात्मक विचार करेल, असे सांगितले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत अंतिम देयके त्वरीत देण्यास तोंडी मान्यता देत बेस्ट प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली. बेस्ट उपक्रमातील परिवहन आणि विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेबाबत आता महत्त्वाचा आणि बऱ्याच काळापासून अपेक्षित निर्णय घेण्यात आला आहे. अधिकारी वर्गाप्रमाणेच कर्मचारी वर्गाच्या बढत्याही त्वरित राबवण्याचा निर्णय बेस्ट प्रशासनाने घेतला असून, यापुढे प्रथम खालच्या पदावरील कर्मचाऱ्यांना बढती दिली जाईल आणि त्यानंतरच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बढत्या करण्यात येतील. आर्थिक अडचणीच्या काळात अधिकारी वर्गाच्या बढत्या होत असताना, कर्मचाऱ्यांच्या बढत्या मात्र थांबल्या होत्या. त्यामुळे निर्माण झालेला असंतोष दूर करण्यास या निर्णयामुळे मोठी मदत होणार आहे. बसचालक आणि बसवाहक यांच्या सेवावाटपात सेवा ज्येष्ठतेला प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, ही पद्धत लागू करण्यासाठी बेस्टवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे. यासोबतच ज्येष्ठता ठरवताना कामगाराची जात हा घटक ग्राह्य धरण्यात येणार नाही, तर केवळ परिचय क्रमांकाच्या आधारेच सेवा-ज्येष्ठता निश्चित केली जाईल, अशी भूमिकाही महाव्यवस्थापकांनी स्पष्ट केली आहे. त्यामुळे कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता आणि न्याय्यतेची भावना निर्माण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. कामगार संघटनांमधील नोंदणीची प्रक्रिया आता अधिक पारदर्शक होण्यासाठी संपूर्णतः ऑनलाईन केली जाणार आहे. त्यामुळे संघटनांचे सदस्यत्व नोंदवताना होणारा मनमानी हस्तक्षेप किंवा गैरव्यवहार थांबू शकतो. सध्या विद्यमान कर्मचाऱ्यांवर वाढत असलेल्या कामाच्या ताणाची दखल घेत प्रशासनाने नवीन ५०० बस-वर्ग कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांवरील कार्यभार कमी होण्यास आणि बससेवा अधिक सुकरपणे चालवण्यास मदत मिळणार आहे. या घडामोडीत जे कर्मचारी काही कारणास्तव बडतर्फ करण्यात आलेले आहेत त्यांना फायदा होणार आहे. कारण बेस्ट उपक्रमाने बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचे पत्र काढलेले आहे. बडतर्फ कर्मचाऱ्यांकडून अर्ज व बॉण्ड पेपरची पूर्तता करून घेण्यात आलेली असून त्यांना पुन्हा कामावर घेण्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या इतर गोष्टींचे आश्वासन मिळाल्याने कर्मचारी संघटनेचा व नारायण राणे प्रणित बेस्ट समर्थ कामगार संघटनेचा विजय मानला जात आहे. तर विशेष म्हणजे या मागण्यांचे नुसते तोंडी आश्वासन मिळालेले नसून याचा मसुदा तयार केला गेला आहे. तो लवकरच बेस्ट प्रशासन बेस्ट महाव्यवस्थापकांना दाखवून त्यावर स्वाक्षरी होईल. त्यामुळे हा मसुद्यातील गोष्टींचे पालन करणे हे बेस्टला बंधनकारक असणार आहे. त्यामुळे आता समर्थ कामगार बेस्ट संघटनेचा दबदबा वाढल्याचे चित्र दिसत आहे. दुसरीकडे, यानंतरच्या दिवशी कामगार नेते शशांक राव यांनी बेस्ट महाव्यवस्थापकांची भेट घेतली. दोन आठवड्यांपूर्वी त्यांनी केलेले उपोषण महाव्यवस्थापकांच्या विनंतीवरून मागे घेतले होते आणि त्या दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत आहे का याची पाहणी करण्यासाठी ते या भेटीला गेले होते. मात्र या चर्चेदरम्यान त्यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही मुद्द्याचा उल्लेख केला नाही, अशी माहिती मिळाली आहे. त्यांनी मुख्यत्वे सध्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. तसेच, खासगी कंत्राटावर कार्यरत असलेल्या बसचालक, वाहक आणि इतर कामगारांच्या प्रश्नांवरही त्यांनी भूमिका मांडली. यामुळे बेस्टचे निवृत्त कर्मचारी स्पष्टपणे नाराज झाले असून त्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांचा सवाल असा की, ''आम्ही इतकी वर्षे बेस्टची सेवा केली, सेवानिवृत्तीनंतर आमची स्थिती अधिक कठीण झाली आहे. मग आमची गरज शशांक राव यांच्या संघटनेला आता वाटत नाही का? केवळ आर्थिकदृष्ट्या महत्त्व असलेले कामगारच संघटनेला दिसत आहेत का?'' निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मते, ही भूमिका कामगार संघटनेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. त्यामुळे आता त्यांच्या असंतोषाला अधिक तीव्रता आली असून, बेस्ट प्रशासनासोबतच संघटनांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तर आता बेस्टचे माजी कर्मचारी भाई पानवडीकर यांनी बेस्ट सेवानिवृत्त कर्मचारी संघटना स्थापन केली असून बेस्ट प्रशासनाविरोधात कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी जोरदारपणे लढण्याचा निर्धार गेल्या आठवड्यात डोंबिवली येथे मेळावा घेऊन करण्यात आला. या संघटनेतर्फे मुंबई बाहेरील म्हणजे मुंबई, महाप्रदेश, ठाणे, डोंबिवली, कल्याण, नवी मुंबई येथील निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्यांच्या संघर्षासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यासाठी आज सोमवारपासून आझाद मैदानात एक दिवसीय उपोषणे करण्यात येणार आहे. याला इतर संघटनांनी साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. दुसरीकडे उबाठा गटाने नेतृत्व बदल केल्याने बेस्ट कामगार सेनेची नेतृत्व सचिन अहिर यांनी यांच्याकडे आले आहे त्यांनी आता कायदेशीर लढ्यासाठी कोणाही कर्मचाऱ्याला आता यापुढे स्वतः पैसे करावे खर्च करावे लागणार नाहीत तर बेस्ट कामगार सेना संपूर्ण न्यायालयीन खर्च करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

# डीपफेक आणि एआयवर आधारित गुन्हे

गेल्या काही वर्षांपासून कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल) आणि विशेषत: डीपफेक तंत्रज्ञानाने आपल्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. एका बाजूला एआयमुळे आरोग्य, शिक्षण, उद्योग अशा अनेक क्षेत्रांत नवनवीन संधी निर्माण होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला याच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. डीपफेक आणि एआय आधारित गुन्हे हे आजच्या डिजिटल युगातील एक मोठे आव्हान बनले आहे. डीपफेक हा शब्द डीप लर्निंग आणि फेक या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. हे एक प्रकारचे सिंथेटिक मीडिया आहे. याचे कार्य लक्षात घेतले असता, डीपफेक तंत्रज्ञान जनरेटिव्ह ॲडव्हर्सेरियल नेटवर्क्स नावाच्या एआयचा वापर करते. याच्या मदतीने एखाद्या व्यक्तीचे फोटो, व्हिडीओ आणि आवाजाचे नमुने घेऊन त्याची हुबेहूब बनावट; परंतु अत्यंत वास्तववादी प्रतिमा, व्हिडीओ किंवा ऑडिओ तयार केले जातात. आपण अनेकदा राजकीय नेत्यांची भाषणे, काही उच्चपदस्त मोठ्या लोकांच्या फोटोखाली व्हिडीओमध्ये रीलमध्ये जे काही ऐकतो, पाहतो ते याच तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केलेले असते. अनेकदा अशा लोकांना समाजात बदनाम करण्यासाठी, त्यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी समाज माध्यमातून असे चुकीचे व्हिडीओ, ऑडिओ, रील्स व्हायरल केले जातात. सर्वसामान्य जनतेला यातील खरे- खोटे समजणे सहजासहजी शक्य होत नाही. याचा परिणाम समाजात तेढ निर्माण करणे, राजकीय समीकरण बदलणे, कोणत्याही संवेदनशील विषयाला वेगळे वळण देणे यावर होताना दिसतो. हे बनावट कंटेंट इतके खरे वाटतात, की ते मूळ आहेत की बनावट, हे ओळखणे कोणत्याही सामान्य माणसाला जवळजवळ अशक्य होते.

एआय आणि डीपफेक आधारित प्रमुख गुन्हे याचा अभ्यास केला असता, समजते की एआय आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर अनेक प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांसाठी केला जात



आहे. त्यातील प्रमुख प्रकार म्हणजेच तोतयागिरी आणि आर्थिक फसवणूक हा होय. गुन्हेगार एआय निर्मित आवाज किंवा व्हिडीओ वापरून पीडितांच्या मित्र, कुटुंबातील सदस्य, किंवा उच्च अधिकाऱ्याची नक्कल करतात. बनावट आणीबाणी किंवा महत्त्वाच्या वायर ट्रान्सफरची मागणी करून लोकांची आर्थिक फसवणूक करतात. चेहरा किंवा आवाज ओळखण्यावर आधारित सुरक्षा प्रोटोकॉल भेदण्यासाठी डीपफेकचा वापर करून बँक खाती हॅक करणे, कर्ज घेणे किंवा क्रेडिट कार्ड उघडणे शक्य होते. खंडणी आणि ब्लॅकमेल करण्यासाठी सुद्धा गुन्हेगार याचा आधार घेतात. गुन्हेगार एखाद्या व्यक्तीचे बनावट, तडजोड करणारे किंवा आक्षेपार्ह व्हिडीओ/फोटो तयार करतात. या बनावट कंटेंटचा वापर करून पीडितांना ब्लॅकमेल केले जाते आणि त्यांच्याकडून पैसे उकळले जातात किंवा त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करण्यास भाग पाडले जाते. चुकीची आणि खोटी माहिती पसरवणे राजकीय नेते किंवा सार्वजनिक व्यक्ती असे काहीतरी बोलत किंवा करतानाचे डीपफेक व्हिडीओ तयार केले जातात, जे त्यांनी प्रत्यक्षात कधीच केले नसते. याचा उपयोग प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्यासाठी, सामाजिक संघर्ष निर्माण करण्यासाठी किंवा निवडणुकांमध्ये गैरसमज पसरवण्यासाठी केला जातो. ओळख चोरी आणि फेक प्रोफाईल्स लोकांचे ऑनलाइन उपलब्ध असलेले फोटो वापरून आणि डीपफेकच्या मदतीने त्यांचे फेक प्रोफाईल्स तयार करणे. या प्रोफाईलचा वापर इतरांची फसवणूक किंवा गैरवर्तन करण्यासाठी केला जातो. या धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे? हे जाणून घेणे आजमितीला खूप आवश्यक आहे. एआय आधारित गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. सत्यापनावर भर द्या : फोनवर किंवा व्हिडीओ कॉलवर एखाद्या ओळखीच्या व्यक्तीने पैशांची मागणी केल्यास, ताबडतोब शंका घ्या. त्यांच्याशी खाजगीरीत्या संपर्क साधून स्वतंत्रपणे माहितीची सत्यता तपासा. डीपफेक व्हिडीओंमध्ये काही विसंगती असतात, जसे की चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांची हालचाल, प्रकाशाची दिशा किंवा आवाजाची गुणवत्ता. अशा बारीक गोष्टींकडे लक्ष द्या. वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवा : सोशल मीडियावर तुमचे खूप जास्त वैयक्तिक फोटो किंवा व्हिडीओ पोस्ट करणे टाळा. गुन्हेगार याच डेटाचा वापर डीपफेक तयार करण्यासाठी करतात. तुमचे पासवर्ड मजबूत ठेवा आणि शक्य असल्यास टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन वापरा. एआय जनरेटेड कंटेंट ओळखा : केंद्र सरकारने निर्देश दिले आहेत, की एआयच्या मदतीने तयार केलेल्या कोणत्याही कंटेंटसोबत (व्हिडीओ, ऑडिओ, फोटो) तो एआय जनरेटेड असा उल्लेख करणे आवश्यक आहे. अशा सूचना असलेल्या कंटेंटवर लगेच विश्वास ठेवू नका. जागरूक रहा : डीपफेक आणि सायबर गुन्ह्यांच्या नवीन पद्धतींबद्दल माहिती ठेवा.आपल्यासोबत असा कोणताही गुन्हा झाल्यास काय कराल? हे लक्षात ठेवा. ताबडतोब तक्रार करणे महत्त्वाचे आहे. सायबर गुन्ह्याची माहिती मिळाल्यास त्वरित राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवा. यासाठी संपर्क क्रमांक मदतीसाठी १९३० या सायबर हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करा. एआय तंत्रज्ञान एक शक्तिशाली साधन आहे; परंतु त्याचा गैरवापर रोखणे आवश्यक आहे. व्यक्तिगत स्तरावर जागरूकता आणि सतर्कता बाळगणे, तसेच कायदेशीर आणि तंत्रज्ञानाच्या स्तरावर कडक नियमावली तयार करणे, हेच डीपफेक आणि एआय आधारित गुन्ह्यांचा वाढता धोका कमी करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

पान १/४ वरून

## प्रभू शंकर आणि नंदकिशोर मूर्ती

भूमिपुत्र सहाय्यक पोलीस निरीक्षक एपीआय महारुद्र बबनराव परजणे पाटील वाई पोलीस स्टेशन, सातारा,शिवसेनेचे युवासेना लोकसभा आष्टी पाटोदा शिरूर व गेवराई विधानसभा कार्यक्षेत्र प्रमुख शिवराज भैय्या उगले, पालवनचे माजी सरपंच चेअरमन रावसाहेब तात्या मस्के, गवळवाडी येथील ज्येष्ठ नेते, ग्रामपंचायत सदस्य चेअरमन अनुरथ भाऊ मस्के, शिवशक्ती युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व रेल्वे कॉन्ट्रॅक्टर इंजिनिअर अर्जुन संतोषराव मस्के पाटील,मजूर फेडरेशन संचालक बद्रीनाथ जटाळ, व्हाईस चेअरमन भगवान आबा मस्के, प्रदीप जोगदंड, भगवान अश्रुबा मस्के, संतोष आश्रुबा मस्के, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई येथील सहाय्यक कक्ष अधिकारी आकाश विकास जटाळ, श्रावण बप्पा मस्के, मदनदादा मस्कर, पालवण गावचे नूतन शासन नियुक्ती निवड झालेले अक्षय पांडुरंग शेळके यांच्यासह रावसाहेब शामराव शेळके, बाळासाहेब शामराव शेळके, भास्कर शामराव शेळके, संदीप बाबासाहेब शेळके, प्रदीप बाबासाहेब शेळके, पांडुरंग महाराज शेळके,सखाराम महाराज शेळके,अशोक शेळके, मसुनाथ शेळके, सोमनाथ शेळके, लक्ष्मण शेळके, गिरधारी शेळके, अजय शेळके व पालवन, पंचक्रोशीतील नागरिक माता-भगिनी भक्तमंडळी उपस्थित होते.

## स्वप्नांवर पाणी; भरती

मानसिक तणाव वाढत असल्याचेही स्पष्टपणे जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून ''आता आश्वासन नको, थेट जाहिरात द्या!'' अशी ठाम आणि तीव्र मागणी केली आहे. शासनाने तात्काळ भरती प्रक्रिया सुरू करून रिक्त पदे भरण्याचा निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही उमेदवारांनी दिला आहे. लघुलेखक भरतीच्या मुद्द्यावरून वाढता रोष, उमेदवारांमधील अस्वस्थता आणि निर्माण झालेली अनिश्चितता लक्षात घेता शासनाने या विषयावर त्वरित, ठोस आणि सकारात्मक निर्णय घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

## सामाजिक कार्यकर्ते डॉ.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. गणेश ढवळे यांच्यासह शेतीनिष्ठ शेतकरी कल्याण कुलकर्णी, प्रमोद कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, विकास उमापुरकर, दिनेश लिंबेकर आणि सुशील कुलकर्णी यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमास शेख युनुस, धनंजय बजगुडे, गणेश शेंडगे, कुमार देशमुख, संतोष कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मावलाई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## डिजिटल अरेस्ट करून

निष्पन्न होताच पोलिसांचे एक पथक तातडीने जळगावला रवाना झाले. पोलिसांनी तेथून प्रसन्न अजय कासट (३१), स्वाती प्रसन्न कासट (२६) आणि संकेत दीपक बेलदार (२२) या तिघांना ताब्यात घेतले.

करन्सी मार्केटच्या नावाखाली व्यवहार

हे आरोपी करन्सी मार्केटमध्ये ट्रेडिंग करून फसवणुकीचे पैसे स्वतःच्या फायद्यासाठी बँक खात्यावर घेत असल्याचे तपासात समोर आले आहे. मुख्य आरोपीने आपल्या पत्नीच्या बँक खात्यावर फसवणुकीची रक्कम वळवली होती. पोलिसांनी आरोपींकडून ३ लाख रुपये रोख जप्त केले असून, बँक खात्यावरील ३ लाख २० हजार रुपये गोठवले (फ्रीज) आहेत. न्यायालयाने आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

''डिजिटल अरेस्ट'' अशी कोणतीही संकल्पना कायद्यात नाही. पोलीस असल्याचे सांगून कोणी व्हिडिओ कॉलद्वारे धमकावत असेल, तर त्यावर विश्वास ठेवू नका. अशी फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बीड जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सपोनि संदीप अराक

पान १/४ वरून

आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पूर्ण केली.

## ऊसतोड कामगारांच्या मागण्यांसाठी

चंद्रकांत शेळके हे प्रत्यक्ष उपस्थित नसल्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये काही काळ असंतोष निर्माण झाला.

यानंतर माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड) यांच्या मध्यस्थीने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करण्यात आली. तहसीलदारांनी प्रतिनिधी मंडळासह उपोषणकर्ते पांडुरंग आंधळे यांची जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर जलसमाधी आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले असून, कामगारांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनात बाळासाहेब मोरे पाटील, माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदाताई पांचाळ (विश्व कल्याण महिला सेवाभावी संस्था), सीताबाई भोसले (महिला जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया)प्रदीप बांगर, बाळसिंह परदेशी, केशव तांदळे, रेवन येडे, माऊली शिरसाट,सतीश (भाऊ) जोगदंड, ज्ञानेश्वर तांदळे,आयुब पठाण, मोहन आघाव,संभाजी कदम,रोशन केकान, अरुण साठे कर्जणीकर,अमोल चौरे, महादेव नाईकवाडे,संपत नागरगोजे, अमोल सावंत,अविनाश मुंडे, बाळासाहेब कळसकर आदींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## वाद होतील अशा

मतभेद आहेत. त्यामुळे एक गट पुतळा त्याच जागी राहावा या भूमिकेवर ठाम होता. दुसरीकडे, दुसऱ्या गटाची भूमिका ही जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असून, तिथे पुतळा बसवण्यास काही मर्यादा किंवा हरकत असल्याचे म्हटलं होतं. या पार्श्वभूमीवर मोठा तणाव निर्माण झाला होता. आत निर्माण झालेल्या वादावर अखेर तोडगा निघाला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आलेली जागा ही खेलोबा देवस्थानची असल्याबाबत दोन्ही समाजाचे

पान १/४ वरून

एकमत झाले आहे. त्यामुळे आता या पुतळ्याचे स्थलांतर केले जाणार आहे. यासाठी दोन्ही समाजाचे प्रतिनिधी मिळून नवी जागा शोधणार आहेत.

## तालुक्यात ४ व ५ एप्रिल रोजी

नाही. तसेच, बीड तालुक्यातील सर्व नागरिकांनी ४ व ५ एप्रिल रोजी (शनिवार/रविवार) सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ या वेळेत आयोजित शिबिरात सहभागी होऊन मतदार नोंदणी व मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी, असेही त्यांनी नमूद केले. नागरिकांनी आपले मतदान ओळखपत्र सोबत आणावेत आणि या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहनही फारूक पटेल, अमर नाईकवाडे व अशफाक इनामदार यांनी केले आहे.

## वारकरी संप्रदायाचा वारसा

यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. जर आपण प्रभू श्रीराम आणि हनुमानाचा आदर्श सोडला, तर देव आणि भक्ताचे नाते टिकवणे कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. या कार्यक्रमाला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राधाकृष्ण नगर भागातील या उत्सवामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील भाविकांच्या उपस्थिती मध्ये हा सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

## बीडमधील बेकायदेशीर

जबाबदारांवर कारवाईची मागणी.

नगरसेवक इनामदार यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, शहराच्या मध्यवर्ती वस्ती भागात अशा प्रकारचा प्लांट सुरू करण्यास परवानगी कोणी दिली? याची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि हा बेकायदेशीर प्लांट तात्काळ बंद करण्यात यावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.या प्रकरणी प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मडका पद्धतीने मशरूम उत्पादन; ३० ते ४० दिवसांत मिळते भरघोस उत्पन्न!

महाराष्ट्रात शेतकरी अलीकडे मोठ्या प्रमाणात मशरूम शेतीकडे वळत आहेत. मुख्य म्हणजे सध्या अनेक पिकांना योग्य तो बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी अन्य पर्यायांचा अवलंब करत आहेत. विशेष म्हणजे मशरूम उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या जागेची आवश्यकता नसते. अगदी छोट्याशा जागेतही शेतकरी मोठ्या प्रमाणात मशरूमचे उत्पादन घेऊ शकतात. ज्यामुळे त्यांना अधिकचे उत्पन्न मिळण्यास मदत होते.

काय आहे मडका पद्धती?

महाराष्ट्रासह देशभरात सध्या मशरूमची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यापूर्वी केवळ शहरी भागांमध्ये मशरूमला मागणी होती. मात्र, गेल्या काही दिवसांत ग्रामीण भागात देखील मशरूमची भाजी विशेष प्रसिद्ध झाली आहे. मडका पद्धतीने मशरूम उत्पादन घेण्यासाठी सर्वसाधारणपणे ३५ ते ४० दिवसांचा कालावधी लागतो. मशरूम उत्पादन घेण्यासाठी मडक्याला छिद्रे पाडले जातात. त्यास कापूस लावून बंद केले जाते. तसेच त्याच्या तोंडाला प्लास्टिकची





पिशवी बांधली जाते. मडक्यावर दिवसातून दोन ते तीन वेळा पाणी टाकले जाते. काही दिवसांनी या छिद्रांमधून कापूस बोळे काढून घेतले जाते.'या' गोष्टींची आवश्यकता : मडके मशरूम बियाण्याचा रोपणासाठी तयार होते. मडक्यावर रोपण केल्यानंतर ७ ते ८ दिवसांनी मशरूमच्या कळ्या दिसायला सुरुवात होते. त्यानंतर मशरूमवर नियमित पाणी शिंपडणे आवश्यक असते. याशिवाय मशरूम उत्पादनासाठी या कालावधीत दररोज कमीत कमी ४ ते ५ तास मशरूमला ट्यूबलाईटचा प्रकाश मिळणे आवश्यक असते. तसेच आपण तयार केलेल्या शेडमध्ये ७५ ते ८० आर्द्रता असणे आवश्यक असते.

किती मिळते उत्पादन? मडका पद्धतींने मशरूम उत्पादन घेण्यासाठी ३५ ते ४० दिवसांचा कालावधी लागतो. एका मडक्यापासून साधारणपणे एक किलोपर्यंत मशरूम मिळते. तर सर्वसाधारणे पद्धतीने त्याच ठिकाणी शेतकऱ्यांना ५०० ते ९०० ग्रॅमपर्यंत मशरूम मिळते. मडका पद्धतीमध्ये मशरूम उत्पादन घेताना दोन बॅचमध्ये जवळपास १० ते १५ दिवसांचा कालावधी ठेवला जातो. या पद्धतीत मशरूम काढणीनंतर, प्लास्टिक पिशव्यांमध्ये बांधून थेट बाजारात विक्रीसाठी पाठवला जाऊ शकतो. किंवा मग मशरूम वाळवला देखील जाऊ शकतो. यासाठी तो कपडयात बांधून उन्हात वाळवण्यासाठी ठेवावा लागतो.

# मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कारांचे थाटात वितरण

बीड: गेवराई तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील मावलाई युवक क्रीडा मंडळ आणि व्यायामशाळेच्या वतीने शुक्रवारी मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. पत्रकारितेतून जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, सामाजिक क्षेत्रातून डॉ.गणेश ढवळे व क्रीडा क्षेत्रातून ठाण्याचे नरेंद्र कदम यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानीत करण्यात आले. शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. मावलाई युवक क्रीडा मंडळाच्या वतीने शुक्रवारी (दि.३) गेवराई तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील मावलाई देवीच्या यात्रेनिमित्त कै.बाबासाहेब वराट सार्वजनीक वाचनालयात आयोजीत कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतीनिष्ठ शेतकरी कल्याण कुलकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी,पत्रकार अतुल कुलकर्णी, अविनाश वाघिरकर,दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, विकास उमापूरकर, क्रीडा मंडळाचे सचिव भागवत वराट आदी उपस्थीत होते. पुरस्कार्थींनी व्यक्त केल्या भावना पुरस्कार प्राप्त नरेंद्र कदम म्हणाले की, ग्रामीण भागातील एखादी संस्था विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करून त्यांना सन्मानित करते हे प्रेरणादायी आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गणेश ढवळे म्हणाले सामाजिक क्षेत्रात काम करत असताना वंचित उपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरून वेळप्रसंगी शासन प्रशासनाला वास्तव सांगून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करतो या पुरस्काराने हे कार्य पुढे नेण्यासाठी बळ मिळाले आहे. तर ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे म्हणाले बीड जिल्ह्याला पत्रकारितेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे या ठिकाणची पत्रकारिता अतिशय परिपक्व आणि विषयानुरूप गांभीर्यपूर्वक लिखाण करून अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारी आहे मागील काही वर्षात अध्यात्म आणि सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल या पुरस्काराने सन्मानित केल्याने अध्यात्म क्षेत्रात लिखाणासाठी आणखी उत्साह वाढला असल्याचे सांगत त्यांनी भागवत वरात यांच्या वराट यांच्या कार्याचे कौतुक केले. सूत्रसंचालन पत्रकार प्रमोद कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास धनंजय बजगुडे, गणेश शेंडगे, कुमार देशमुख संतोष कदम युनूस शेख यांच्यासह बऱ्हाणपूर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. पुढील वर्षापासून शेतीनिष्ठ शेतकऱ्यांना पुरस्कार क्रीडा मंडळाचे सचिव भागवत वराट प्रास्तविकात बोलतांना मागील १९ वर्षांपासून मावलाई देवी यात्रेनिमित्त बऱ्हाणपूर येथे अध्यात्म, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात अविरत योगदान देणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आगामी काळातही या पुरस्कारांची परंपरा कायम ठेवली जाणार असून पुढील वर्षीपासून कृषी क्षेत्रात अमूल्य योगदान देणाऱ्या शेतकऱ्यालाही या पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याचे वराट यांनी सांगीतले. अशा कार्यासाठी आम्ही सोबत राहू ग्रामीण भागामध्ये वाचनालयाच्या माध्यमातून तरुण पिढीला लिहिते आणि बोलते करण्यासाठी ग्रंथालय व वाचनालयाची चळवळ अविरतपणे पुढे नेत असताना त्या माध्यमातून समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित करण्याचे भागवत वराट व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कार्य नक्कीच प्रेरणादायी आहे अशा कार्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू असे कार्यक्रमाचे अध्यक्ष कल्याण कुलकर्णी यांनी सांगीतले.

## वारकरी संप्रदायाचा वारसा जोपासणे ही काळाची गरज- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाचा पाया भक्कम असून संतांच्या आशीर्वादाने आज गावोगावी नामस्मरण सुरू आहे. समाज एकत्र आणणे हाच यामागचा मुख्य उद्देश असून, संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर समाज घडवण्याचे काम वारकरी कुटुंब करत आहेत. आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



बीड येथील राधाकृष्ण नगरी भागात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी नमूद केले की, शक्ती आणि भक्तीची सांगड घालून हनुमानाची आराधना आणि परमेश्वराचे नामस्मरण करणे ही आपली परंपरा आहे. राधाकृष्ण नगरी भागातील नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा देण्याचा आमचा कायम प्रयत्न राहिला आहे. विकासाची ही आस आम्ही पूर्ण केली असून, येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या माध्यमातून धार्मिक कार्यालाही बळ मिळत आहे सध्याच्या काळात वाढत चाललेली 'भोंदूगिरी' आणि समाजाची होणारी दिशाभूल यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. जर आपण प्रभू श्रीराम आणि हनुमानाचा आदर्श सोडला, तर देव आणि भक्ताचे नाते टिकवणे कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. या कार्यक्रमाला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राधाकृष्ण नगर भागातील या उत्सवामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील भाविकांच्या उपस्थिती मध्ये हा सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

## ऊसतोड कामगारांच्या मागण्यांसाठी पांडुरंग आंधळे यांचे उपोषण १४ व्या दिवशी; प्रशासन अद्याप उदासीन

बीड प्रतिनिधी : ऊसतोड कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ऊसतोड कामगार श्री. पांडुरंग वामनराव आंधळे हे जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मागील १४ दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सरकारच्या उदासीन धोरणाचा निषेध म्हणून व ऊसतोड कामगार श्री पांडुरंग वामनराव आंधळे यांना पाठिंबा देण्यासाठी श्री.बाळासाहेब मोरे पाटील (संस्थापक अध्यक्ष, शिव शाहू ऊसतोड कामगार संघटना) यांच्या नेतृत्वाखाली पाली येथील बिंदुसरा प्रकल्पात तब्बल पाच तास जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रमुख मागण्या: ऊस तोडणी व भरणी दर ५०० प्रति टन करण्यात यावा व वाहतूक दरात दुप्पट वाढ करावी ऊसतोड भरणी व वाहतुकीचा करार दरवर्षी करण्यात यावा ऊस तोडणीदरम्यान प्रसूती झाल्यास माता भगिनींना २५,००० प्रसूती भत्ता देण्यात यावा ऊसतोड कामगारांची अधिकृत नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात यावे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी २०१४-१५ गळीत हंगामासाठी जाहीर केलेली २०% दरवाढ तात्काळ लागू करावी या जलसमाधी आंदोलनादरम्यान मंडळ अधिकारी शितलताई चाटे या उपस्थित होत्या व त्यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. मात्र, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे प्रत्यक्ष उपस्थित नसल्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये काही काळ असंतोष निर्माण झाला. यानंतर माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड) यांच्या मध्यस्थीने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करण्यात आली. तहसीलदारांनी प्रतिनिधी मंडळासह उपोषणकर्ते पांडुरंग आंधळे यांची जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर जलसमाधी आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले असून, कामगारांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनात बाळासाहेब मोरे पाटील, माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदाताई पांचाळ (विश्व कल्याण महिला सेवाभावी संस्था), सीताबाई भोसले (महिला जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया)प्रदीप बांगर, बाळसिंह परदेशी, केशव तांदळे, रेवन येडे, माऊली शिरसाट,सतीश (भाऊ) जोगदंड, ज्ञानेश्वर तांदळे,आयुब पठाण, मोहन आघाव,संभाजी कदम,रोशन केकान,
अरुण साठे कर्जणीकर,अमोल चौरे, महादेव नाईकवाडे,संपत नागरगोजे, अमोल सावंत,अविनाश मुंडे, बाळासाहेब कळसकर आदींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## लोकमतच्या मराठवाडा गौरव पुरस्काराने कृषीभूषण महेश बेदरे सन्मानित

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये गेल्या अठरा वर्षापासून कृषी क्षेत्रामध्ये अविरतपणे कार्य करणारे गेवराई येथील कृषीभूषण महेश बेदरे यांना लोकमत वृत्तपत्र समूहाच्या वतीने मराठवाडा गौरव मराठवाडा भूषण २०२६ पुरस्काराने संभाजीनगर येथे कार्यक्रमांमध्ये माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले




### कृषी क्षेत्रातील कार्याचा येतोचित सन्मान

वयाच्या सतरा वर्षापासून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारे महेश बेदरे यांना राज्य शासनाचा कृषिभूषण, विविध संस्थांच्या वतीने कृषिरत्न, आता लोकमत वृत्तपत्राच्या वतीने मराठवाडा स्तरावरील मराठवाडा गौरव मराठवाडा भूषण हा पुरस्कार देऊन बीड जिल्ह्याच्या शिरपेचात महेश बेदरे यांच्या माध्यमातून तुरा रोवला आहे मराठवाड्यामध्ये कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांना नव आधुनिक तंत्रज्ञान बरोबर कृषी, सामाजिक, सहकार, राजकीय कार्यामध्ये अग्रेसर असणारे महेश गणेशराव बेदरे अखंडपणे सेवार्थ असतात याच कार्याची दखल घेऊन लोकमत वृत्तपत्रासमूहने दिनांक ३१ मार्च रविवार रोजी राज्याचे माजी मंत्री तथा लोकमत वृत्तपत्र समूहाचे चीफ संपादक राजेंद्र बाबू दर्डा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महेश बेदरे हे किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठवाड्यातील हिंगोली,परभणी, जालना,बीड, गेवराई या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करतात त्याचबरोबर किसान अर्बन क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून सहकार क्षेत्रामध्ये ही त्यांचे भरीव योगदान असून त्याचबरोबर राजकीय क्षेत्रातील काँग्रेस पक्षाचे ते तालुकाध्यक्ष आहेत या मिळालेल्या पुरस्काराबद्दल राज्यभरातून त्यांच्यावर मान्यवरांनी शुभेच्छाचा वर्षाव केला आहे.

## कारखान्यास मजूर पुरवतो म्हणून फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीचा जामीन फेटाळला

माजलगाव । प्रतिनिधी

कर्नाटक राज्यातील साखर कारखान्याला ऊसतोड मजूर आणि वाहने पुरवण्याचे आमिष दाखवून २२ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीचा जामीन अर्ज माजलगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. वडवणी तालुक्यातील खडकी येथील फिर्यादी रामकिसन शंकर चोले यांनी श्री. बसवेश्वर शुगर लि. कारजोल (कर्नाटक) या कारखान्याशी मजूर पुरवण्याचा करार केला होता. या कामासाठी आरोपी सुधाकर भानुदास राठोड (रा. रामनगर, माजलगाव) याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून, स्वतःकडे मजूर आणि वाहने उपलब्ध असल्याचे सांगितले. मजुरांच्या उचलीपोटी फिर्यादीने आरोपीला वेळोवेळी आर.टी.जी.एस. आणि चेकद्वारे एकूण २२ लाख ८० हजार रुपये दिले.मात्र, आरोपीने मजूर, वाहने पुरवली नाहीत आणि घेतलेली रक्कमही परत न देता फसवणूक केली. याप्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर. आरोपीने सत्र न्यायालयात जामिन अर्ज केला होता. सुनावणी दरम्यान फिर्यादीच्या वतीने सरकारी वकील अ‍ॅड.आर ए वाघमारे यांनी काम पाहिले तर अ‍ॅड. अरुण बंडू तिडके यांनी सरकार पक्षाला सहाय्य केले.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. सत्र न्यायाधीश श्रीमती परदेशी मॅडम यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपी सुधाकर राठोड याचा जामीन अर्ज फेटाळून लावला.



## मानवी जीवनाच्या कल्याणासाठी संताचे कार्य केले- महादेव महाराज चाकरवाडीकर

बीड । प्रतिनिधी

संताचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. संत हे जगाच्या कार्य करतात. संताचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. देव आणि संत एकाच नाण्याच्या बाजू आहेत. संताच्या सहवासात राहिल्यास मानवी जीवनाचे कल्याण होते असे प्रतिपादन ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी केली.



बीड शहरातील राधाकृष्णनगरी येथे शिव समर्थ दक्षिणमुखी हनुमान मंदिर व नवग्रह मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या काल्याच्या कीर्तनात महादेव महाराज चाकरवाडीकर बोलत होते.

याप्रसंगी कीर्तनात पुढे बोलताना महादेव महाराज म्हणाले, साधू, संत आणि भगवान परमात्म्याच्या संगतीने सानिध्यात कल्याण होते. जीवन मुक्तीचे सुख प्राप्त झाले. व्यवहारी जीवनात चिंता असते. चिता मानसिक विकृती आहे. माणसाने जीवनात निश्चिंत असावे.

'आपला तो एक देव करून घ्यावा' या जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर बोलतांना ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी भाविकांना मंत्रमुग्ध करणारे निरूपण केले.

जगाच्या बाजारात सर्व मिळेल. प्रेम मिळत नाही. भगवान परमात्म्यारखे कोणीच प्रेम करत नाही. आत्मा सत्य, अविनाशी आहे. आत्म्यावर प्रेम करावे, असे सांगून श्रीकृष्ण, गवळीच्या क्रीडा, लीलांचे सुंदर वर्णन केले. विविध दृष्टांत देऊन कृष्णाच्या आणि सवंगड्याच्या काला सांगितला. काल्याच्या कीर्तनात महादेव महाराज चाकरवाडीकर सामाजिक स्थितीवर भाष्य केले. काल्याच्या कीर्तनात कीर्तन कार्यक्रमात गायनाचार्य माऊली मारकड भुसारी महाराज, मनोज बोठे, मृदंगाचार्य लष्करे महाराज यांनी साथसांगत केली.

# मृत्यू अर्भक प्रकरणी पोलिसांनी आरोपीला पकडले

जालना । प्रतिनिधी

परतूर मंठा वाटूर फाटा येथे एक अंदाजे पाच ते सहा महिन्याचे नवजात स्त्री जातीचे अर्भक मृत अवस्थेत कागदात गुंडाळून ठेवलेल्या अवस्थेत ठेवल्याची माहीती मिळ्याल्याने वाटूर पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक नंदू खंदारे यांचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे परतूर येथे गु.र.नं. ४३/२०२६ कलम ९१ भा.न्या.सं. २०२३ नुसार गुन्हा दाखल होवून तपास पोस्टेचे वाटुर चौकी इनचार्ज व सहा. पोलीस निरीक्षक श्री. बालाजी वैद्य यांचे कडे दिला. त्यानंतर त्यांनी प्रथम नवजात अर्भकास जालना येथे रुग्नालयात दाखल केले व घटना घडली त्याठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन तपासाची चक्रे फिरवून तपासास सुरुवात केली. घटनास्थळाच्या आजुबाजुच्या सीसीटीव्ही फुटेज तपासल्या नंतर परतुर कडुन जालना जाताना एक मोटार सायकल वर एक पुरुष व दोन महिला असे तीघेजन तोंडाला रुमाल गुंडाळून वादुर फाटा येथे घटलेल्या ठिकाणाजवळ थांबले व त्यापैकी एकाने आजुबाजुला नजर फिरवुन त्यानंतर त्यापैकी एका महिलेने घटनास्थळावर जावुन तेथे काहीतरी ठेवल्यासारखे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसले. त्यानंतर तपास अधिकारी श्री वैद्य सोबत यांचे सोबत वाटुर चौकीचे ग्रे. पोज्पनी खंदारे, पोका देवीदास जाधव, पोका राम पारवे, पोका अमोल तिबुले, पोका महेश कोरडे असे सर्व स्टाफ वाटर ते परतूर तसेच परतूर ते जालना रोडवरील सर्व सीसीटीव्ही फुटेज चेक करुन तपासाला गती देवून मा. वरीष्टांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हाचा तपास चालु ठेवला.

तेव्हा सदर मोटार सायकल वरील तीन संशयीत व्यक्तीची ह्या टोलनाका क्रॉस करुन जालना कडे जाताना दिल्या त्यानंतर जालना पोलीस कंट्रोल रुम मधील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर सदरील मोटार सायकल ही मंठा चौफुली जालना येथून लालबाग जालना येथे जाताना दिसली तेव्हा मा. सपोनी वैद्य व ग्रे. पोज्पनी खंदारे यांनी त्यांचे गुप्त बातमीदार नेमून सदर मोटार सायकल व त्यावरील संशयीत व्यक्तीची माहीती घेतली असता मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी पोस्टेचे पोका देवीदास जाधव, पोका राम पारवे, पोका अमोल तिबुले, पोका महेश कोरडे असे आरोपी शोध कामी सकाळी सापळा रचला



असता यातील संशवीत महिला नामे शिवानी कैलास निकाळजे वय २३ वर्षे रा. राजीव गांधी नगर लालबाग जालना वांना महिला पोलीस अंमलदार वाघ मॅडम यांनी ताब्यात घेवून गुन्ह्याचे संदर्भात विश्वासात घेवुन विचारपुस केली तेव्हा त्यांनी सदरचा गुन्हा कबुल करुन गुन्ह्याचा घटना क्रम पोलीसांसमोर सांगितला आहे. सदर गुन्हा करण्यासाठी तिला तीचा होणारा पती गणेश बबन कांबळे रा. रामनगर जालना व तिची सासु दुर्गाबाई बबन कांबळे रा. रामनगर जालना असे व आरोपी गणेश कांबळे यांचा इतर एक नातेवाईक असे एकुण चार लोकांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली होती त्यावरुन गुन्ह्यातील आरोपी गणेश बबन कांबळे हा फरार होता त्याचे शोधात वाल्मिक नगर, जालना येथे सपोनी वैद्य व पोउपनी खंदारे यांनी गुप्त बातमीदार नेमुन त्यांना मार्गदर्शन केले होते. त्यानंतर दि. ३१/०३/२०२६ रोजी गुप्त बातमीदारांमार्फत माहीती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी गणेश बबन कांबळे हा त्याचे घरी वाल्मिक नगर, जालना येथे आलेला आहे अश्या मिळालेल्या बातमी वरुन आम्ही पोउपनी खंदारे सोबत पोका देवा जाधव, पोका राम पारवे, मपोका वाघ असे रवाना झालो व सदर आरोपीस ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यास गुन्ह्यात अटक करुन ०३ दिवस घेतली होती. त्यानंतर मध्ये गुन्ह्याचे तपासा दरम्याण आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता माहे-०३/२०२५ मध्ये त्याचे भिमनगर जालना येथील एका महिले सोबत शारिरीक संबंध झाले होते तिने सुद्धा सदर आरोपीकडुन गर्भपाताच्या गोळ्या घेवुन बेकायदेशीर गर्भपात करुन भिम्मनगर जालना येथील कचराकुंडीत टाकले होते त्यावरुन सदर बजार पोलीस ठाणे येथे संपर्क करुन माहीती घेता तेथे गु.र.नं. २३५/२०२५ कलम ९१ बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून तो सदर आरोपीने केल्याचे तपासात निष्पन्न झाल आहे. सदर आरोपीने गर्भपाताच्या गोळ्या स्वामी विवेकानंदर हॉस्पीटल जालना येथे लॅब असिस्टंट म्हणून काम करणारा प्रकाश कसबे रा. संजय नगर, जालना यांचे कडुन बेकायदेशीर रित्या घेवून यातील महिला आरोपी शिवानी निकाळजे हिस देवुन तिचा बेकायदेशीर रित्या गर्भपात केला आहे. सदर गुन्ह्यात चार आरोपी निष्पन्न झालेल असुन त्यापैकी दोन आरोपी नामे १) प्रकाश कसबे रा. संजय नगर, जालना व २) दुर्गाबाई बबन कांबळे रा. वाल्मिक नगर, जालना हे फरार असुन त्यांचा शोध घेणे कामी मा. पोनी भागवत सो यांचे मार्गदर्शनाखाली एक पथक रवाना केले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपानी सो, मा. ज्यविभागीय पोलीस अधिकारी परतुर श्री. रामेश्वर रेंगे सो यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोनी भागवत सो यांनी व वाटुर चौकीचे पोउपनी नंदु खंदारे, पोका देवीदास, पोका राम पारवे, पोका अमोल तिबुले, पोका प्रशांत काळे, पोका सुनिल इलग, पोका महेश कोरडे व मपोका सपना वाघ यांनी मिळून वरिष्टांच्या मार्गदर्शनाखाली सखोल तपास करुन व तांत्रिक गोष्टीचे विष्लेशन करुन पार पाडली आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे





सायं.दैनिक
बीड
प्रारंभ
शनिवार, दि.०४ एप्रिल २०२६








# पाली येथे संत तुकाराम व संताजी जगनाडे महाराज यांच्या मूर्तींची भव्य प्राणप्रतिष्ठा

पाली । प्रतिनिधी

येथील ग्रामस्थांच्या वतीने आणि लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात संत तुकाराम महाराज आणि संत संताजी जगनाडे महाराज यांच्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मंगल प्रसंगी राज्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी विशेष उपस्थिती लावून ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एम.ए. राऊत यांनी केले. त्यांनी सांगितले की, गावात संतांचे मंदिर असावे अशी ग्रामस्थांची अनेक वर्षांची इच्छा होती. जागेची उपलब्धता झाल्यानंतर १० ते १५ गुंठ्यांच्या जागेत गावकर्यांनी स्ववर्गणी आणि श्रमदानातून हे भव्य मंदिर साकारले आहे. या



कार्यासाठी गावातील महिला आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या भाविकांनीही मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमात बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संतांचे विचार हे समाजाला दिशा देणारे आहेत. आजच्या मोबाईलच्या युगात लहान मुले आणि तरुण पिढीवर होणारे परिणाम चिंताजनक आहेत. अशा वेळी धर्माच्या नावाखाली होणारा संकुचितपणा सोडून संतांच्या समतेच्या विचारांची गरज आहे. अंधश्रद्धेला थारा देऊ नका असे सांगत श्रद्धा असावी, पण अंधश्रद्धेपासून दूर राहून सारासार विचार करणे गरजेचे आहे. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत एकनाथ महाराज यांच्या अभंगांतून जीवनाचे सार मिळते. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून हे विचार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे, जे कौतुकास्पद आहे असे ते म्हणाले. या सोहळ्याला ह.भ.प. हरिहर महाराज, विवेकानंद महाराज, ह.भ.प.प्रशांत क्षीरसागर महाराज, तानाजी शिंदे, विलास बडगे, बाळासाहेब, उमेश लांडगे, दिलीप राऊत, सुभाष क्षीरसागर यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व धर्माचा मूळ गाभा एकच आहे, असा संदेश देत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी ग्रामस्थांच्या या विधायक कार्याचे कौतुक केले. यावेळी पाली येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे नवीन इमारतीत स्थलांतर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई हे कार्यालय आता स्वतःच्या मालकीच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे.

लातूरछत्रपती संभाजीनगर महामार्गालगत, स्व. विमलताई मुंदडा आरोग्य संकुल, सेंजारी, मौजे लोखंडी सावरगाव येथे बांधण्यात आलेल्या नवीन कार्यालयीन इमारतीमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे सर्व कामकाज दि. ०६ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.




त्यामुळे वाहन नोंदणी, वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), परवाने, कर भरणा तसेच इतर सर्व परिवहन कार्यालयाशी संबंधित कामकाजासाठी नागरिकांनी यापुढे लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयात उपस्थित राहून आपली कामे करून घ्यावीत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई यांनी केले आहे. नवीन कार्यालयीन इमारतीमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून कामकाज अधिक सुलभ व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन पुढील सर्व कामकाजासाठी लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयाचा उपयोग करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे मावलाई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

बीड (दि.०४) : गेवराई तालुक्यातील ब-हाणपुर येथील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळेच्या वतीने पत्रकारिता, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांना दरवर्षी ''मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार'' देऊन गौरविण्यात येते.

दि.०३ रोजी मावलाई देवी यात्रेनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश



ढवळे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. ढवळे यांनी जिल्ह्यातील विविध जनतेच्या प्रश्नांवर लोकशाही मार्गाने आंदोलने करत आवाज उठवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भागवत वराट यांनी सांगितले की, गेल्या १९ वर्षांपासून अध्यात्म, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मानित करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रमोद कुलकर्णी यांनी केले. >> पान २ वर...

# चांगल्या शिक्षकाची उणीव कोणीही भरून काढू शकत नाही –माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

माणूस निवृत्त झाला तरी काम करण्याची उमेद कायम असली पाहिजे. भास्कर चादर हे प्रवेशापासून निवृत्तीपर्यंत एक उत्कृष्ट शिक्षक म्हणून कार्यरत राहिले. समाजात अनेक गोष्टी बदलतील, पण एका चांगल्या शिक्षकाची जी उणीव असते, ती कोणीही भरून काढू शकत नाही, असे गौरवद्गार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी काढले.

विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. भास्कर चादर यांच्या सेवागौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, अरुण डाके, प्रा.सर्जेराव काळे, सरपंच, प्रभारी प्रशासक योगेश पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बदलत्या काळावरही भाष्य केले. ते म्हणाले की, आजच्या वातावरणात मोठा बदल झाला आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हातात नवीन तंत्रज्ञान आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे अनेक कामे सोपी होत असली, तरी त्याचा गैरवापर होऊन वादही निर्माण होत आहेत. अशा वेळी नव्या पिढीला योग्य मार्गदर्शन करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कामासाठी केला तर आयुष्य घडते, अन्यथा ते उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही असे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी म्हटले

## ३३ वर्षांचा सेवाप्रवास

आपल्या सत्काराला उत्तर देताना प्रा. भास्कर चादर भावूक झाले होते. त्यांनी आपल्या प्रवासाचा उलगडा करताना सांगितले की, १९८२ साली जिल्हा परिषद शाळेतून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर नवगण राजुरी येथे पुढील शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यावर मला आदर्श शिक्षण संस्थेत नोकरीची संधी मिळाली आणि आज या सेवेला ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीराम जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अनुसे यांनी मानले. या सोहळ्याला परिसरातील नागरिक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वप्नांवर पाणी ; भरती न आल्याने लघुलेखक विद्यार्थ्यांची हतबलता

बीड प्रतिनिधी

लक्ष्मण घायतिडक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत () मुंबई क्षेत्रातील लघुलेखक पदांसाठी साधारणतः दर तीन वर्षांनी भरती प्रक्रिया राबवली जात होती. त्यानुसार २०१२, २०१५, २०१८ आणि २०२१ (कोविडमुळे २०२२) या कालावधीत जाहिराती प्रसिद्ध झाल्या होत्या. या नियमित पॅटर्ननुसार मार्च-एप्रिल २०२५ मध्ये पुढील भरती अपेक्षित होती. मात्र, मार्च २०२६ संपला तरी कोणतीही अधिकृत जाहिरात किंवा ठोस हालचाल दिसून न आल्याने उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. लघुलेखकांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याची माहिती समोर येत असतानाही भरती प्रक्रिया सुरू न होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. ''रिक्त पदांचा डोंगर असूनही भरती शून्य का?'' असा थेट सवाल उमेदवारांकडून उपस्थित केला जात असून शासनाकडून केवळ आश्वासनांची पुनरावृत्ती होत आहे, मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कृती दिसत नसल्याचा आरोपही मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. दरम्यान, लघुलेखक पात्रता मिळवण्यासाठी हजारो विद्यार्थ्यांनी ३ ते ४ वर्षे सातत्याने कठोर परिश्रम घेतले आहेत. अनेकांनी इतर संधी बाजूला ठेवून या भरतीवर लक्ष केंद्रित केले. मात्र पात्र ठरूनही भरती जाहीर होत नसल्याने त्यांच्या करिअरसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वाढते वय, मर्यादित स्पर्धात्मक संधी आणि सततचा विलंब यामुळे उमेदवारांमध्ये >> पान २ वर...

# प्रभू शंकर आणि नंदकिशोर मूर्ती बरोबरच आपल्या दिवंगत आई-वडिलांची मूर्ती स्थापन करून शेळके परिवाराने आदर्श परिवाराचा पायंडा पाडला-गणेश उगले

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पालवन या गावामध्ये जुन्या शेळके वस्ती येथील आणि आज महंत श्रीरंग महाराज डोंगरे यांनी घोषणा केलेल्या रामेश्वर वस्ती मधील शेतकरी कुटुंबातील कै. शामराव गोविंदराव शेळके व कै. सुशिलाबाई शामराव शेळके यांचे वर्षभरापूर्वी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. उभी हयात भर कबाड कष्ट करून त्यांनी कुटुंब जगविले. मुलांना योग्य संस्कार दिले. मुलांना शिक्षण व व्यवसायामध्ये बळ दिले. आणि आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे मुले, मुली व नातवंडाने त्यांच्या कष्टाचे त्यांच्या संस्काराचे मोल जपत श्रीक्षेत्र महर्षी गौतम ऋषी मंदिर



संस्थान मठाधिपती श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली हरिभक्त परायण रामेश्वर महाराज चव्हाण यांची तीन दिवसाची भागवत कथा तसेच पालवणचे पुरोहित वेदशास्त्र संपन्न सुरेश देवा भोगे, शेखर देवा भोगे, मयूर देवा भोगे यांच्या शुभहस्ते आज रामेश्वर नगर पालवण येथे भगवान श्री शंकर, श्री नंदिकेश्वर यांच्या मूर्ती बरोबरच शेळके परिवाराचे आधारवड राहिलेले कै. शामराव गोविंदराव शेळके व कै. सुशिलाबाई शामराव शेळके यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. शेळके परिवाराने आई-वडिलांची मूर्ती स्थापन करून समाजातील इतर कुटुंबांना आदर्श पायांना पडला आहे असे प्रतिपादन यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले यांनी केले या कार्यक्रमास उपस्थित राहून आई-वडिलांचे मूर्ती स्थापन करणाऱ्या शेळके कुटुंबाचे जिल्हा शिवसेनेच्या वतीने अभिनंदन केले. या कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा एपीएमसी बीडचे संचालक गणेश बप्पा उगले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शेळके परिवाराचे भाचे जावई व खालापुरी गावचे >> पान २ वर...

# ऊसतोड कामगारांच्या मागण्यांसाठी पांडुरंग आंधळे यांचे उपोषण १४ व्या दिवशी ; प्रशासन अद्याप उदासीन

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ऊसतोड कामगार श्री. पांडुरंग वामनराव आंधळे हे जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मागील १४ दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सरकारच्या उदासीन धोरणाचा निषेध म्हणून व ऊसतोड कामगार श्री पांडुरंग वामनराव



आंधळे यांना पाठिंबा देण्यासाठी श्री.बाळासाहेब मोरे पाटील (संस्थापक अध्यक्ष, शिव शाहू ऊसतोड कामगार संघटना) यांच्या नेतृत्वाखाली पाली येथील बिंदुसरा प्रकल्पात तब्बल पाच तास जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे

## पाली बिंदुसरा धरणात पाच तास जलसमाधी आंदोलन

शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

प्रमुख मागण्या:

ऊस तोडणी व भरणी दर ५०० प्रति टन करण्यात यावा व वाहतूक दरात दुप्पट वाढ करावी

ऊसतोड भरणी व वाहतुकीचा करार दरवर्षी करण्यात यावा

ऊस तोडणीदरम्यान प्रसूती झाल्यास माता भगिनींना □२५,००० प्रसूती भत्ता देण्यात यावा, ऊसतोड कामगारांची अधिकृत नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात यावे

तत्कालीन मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी २०१४-१५ गळीत हंगामासाठी जाहीर केलेली २०% दरवाढ तात्काळ लागू करावी. या जलसमाधी आंदोलनादरम्यान मंडळ अधिकारी शितलताई चाटे या उपस्थित होत्या व त्यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. मात्र, बीडचे तहसीलदार

# डिजिटल अरेस्ट करून २३ लाखांची फसवणूक

## जळगावच्या पती-पत्नीसह तिघांना बीड सायबर पोलिसांकडून अटक

बीड । प्रतिनिधी

'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली परळी येथील एका व्यक्तीची २३ लाख ४२ हजार ८८८ रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा बीड सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी जळगाव येथून पती-पत्नीसह तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून रोख रक्कम आणि बँक खात्यातील रक्कम असा एकूण ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



नेमकी घटना काय?

परळी येथील रहिवासी सूर्यकांत निवृत्तीराव मुंडे यांना सायबर चोरट्यांनी 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवून तब्बल २३ लाख ४२ हजार ८८८ रुपयांना लुटले होते. याप्रकरणी बीड सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अशी झाली कारवाई

तक्रार प्राप्त होताच बीड सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला. हे आरोपी जळगाव येथील असल्याचे >> पान २ वर...

# मुकुंद तांदळे सेवानिवृत्त ; बँक घोटाळा तपासात अहम भूमिका

बीड। प्रतिनिधी

काही पोलीस कर्मचारी-अधिकारी असे असतात की नकारात्मक दृष्ट्या त्यांच्याकडे बोट दाखवता येत नाही,

मुकुंद सुर्यभान तांदळे त्यापैकीच एक. त्यांनी शिरूर येथून पोलीस सेवेचा श्रीगणेशा केला, त्या नंतर तलवाडा, अंबाजोगाई, धारूर, स्थानिक गुन्हे शाखा, डिएसबी आणि आर्थिक गुन्हे शाखेत ३३ वर्ष पोलीस सेवा करून ३५०+ रिवार्ड मिळवले आणि प्रतिष्ठेच्या अशा पोलीस महासंचालक सन्मान चिन्हावरही नाव कोरले, आपल्या ३३ वर्षाच्या पोलीस सेवेत त्यांनी खात्यातील शिक्षेला कधी जवळही फिरकु दिले नाही ही फार मोठी बाब आहे. १९९० च्या दशकातील त्यांचे बिकॉम पर्यंतचे शिक्षण, चऱ्हाटा गावातील तरुणांमध्ये व्यायाम आणि खेळाची क्रेझ, त्यामुळे तांदळे यांनी पोलीस सेवेला प्राधान्य दिले. पोलीस सेवेत व्यसनापासून दुर राहिल्यास लोकांचा विश्वास आणि वरिष्ठांची मर्जी सहजपणे संपादन करता येते, लोभ- मोह-माया-मत्सरापासून दुर राहिल्यास मन ही प्रसन्न आणि तृप्त ठेवता येते, हि किमया करतांना तांदळे यांनी काही कटाक्ष जबाबदारीने पाळले, त्यामुळे पोलीस ठाणे असो की कुठली शाखा ते मध्यवर्ती भूमिकेचा भाग असायचे, एखाद्या गुन्ह्याच्या तपासात त्यांनी लक्ष घातल्यानंतर शिक्षा अटळ मानली जायची, क्राईम रायटर म्हणून त्यांची कारकीर्द मोठी लक्षवेधी ठरलेली आहे, वरिष्ठांनी सोपवलेले कोणतेही काम जिव ओतून करायचे ही त्यांची वृत्ती त्यामुळे कुठे कसली कसर रहायची नाही, अनेक गुंतागुंतीचे तपास मुकुंद तांदळे यांनी हातोहात पुर्ण केले, बीड पोलीस दलाच्या इतिहासात सुरेश कुटेच्या ज्ञानराधाचा गुन्हा मैलाचा दगड ठरणारा आहे त्यांची व्याप्तीच एवढी मोठी होती की तपास कसा होणार? अशी अनेकांना शंका होती, या तपासा दरम्यान आर्थिक गुन्हेशाखेत अनेक प्रभारी आले गेले पण क्राईम रायटर म्हणून अगदी सेवानिवृत्ती पर्यंत मुकुंद तांदळे कायम आर्थिक गुन्हेशाखेत राहिले, ज्ञानराधाबरोबर च जिजाऊ माँसाहेब, राजस्थानी, साईनाथ, या बँक घोटाळ्याच्या तपासातही तांदळे यांचे योगदान लक्ष्यवेधी राहिले, शिवाय वक्फ बोर्ड जमीन घोटाळ्याचा तपासही त्यांनी मोठ्या क्षमतेने केला, नोकरीदरम्यान अनेक जिवघेण्या प्रसंगानाही त्यांनी तोंड दिले, तलवाडा येथे कार्यरत असतांना सपोनी अजीत लकडे आणि त्यांच्या अंगावर धारदार शस्त्र घेवून एक पारधी गुन्हेगार चाल करून आला होता तेव्हा अजीत लकडे यांनी त्या गुन्हेगाराच्या पायावर गोळी झाडून त्याला जायबंद केले होते त्यावेळी जिवाची पर्वा न करता ऐन तारुण्यात असलेल्या मुकुंद तांदळे यांनी त्या खुंखार गुन्हेगारास झडप घालून पकडले होते या घटणेची त्यावेळी मोठी चर्चा झाली होती, पत्नी, मुलगा श्रिकांत आणि तलवाड्याच्या त्वरीता देवीचा प्रसाद म्हणून पोटी जन्म घेतलेली त्वरीता नावाची डॉक्टर मुलगी, आदर्श असे हे कुटूंब, सेवानिवृत्ती निमीत्त मुकुंद तांदळे आणि परिवारास लक्ष-लक्ष्य शुभेच्छा.

